# सायबर सिक्युरिटी मार्गदर्शन कार्यशाळा



16 September

मातृभूमि वृत्तसेवा

।खेर्डा, दि.१६।

येथील विठाई विद्यालयात सायबर सिक्युरिटी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सायबर गुन्हे आणि त्याचे प्रकार,सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाईन गुन्हे कसे घडतात, इंटरनेट आणि मोबाईलद्वारे होणारे गुन्हे, फसव्या वेबसाईट्स आणि त्याद्वारे होणारी फसवणूक तसेच ऑनलाईन फसवणूक होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी, याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन मोबाईलचा योग्य वापर कसा करावा, याविषयी शपथ देण्यात आली.

कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोलाच्या सहकार्याने तसेच किक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल मुंबईच्या सहकार्याने आयोजित केली होती. यामध्ये महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स सार्थक ठाकरे व अभय सुरडकर यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या प्राचार्य पुष्पा बोधडे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.